Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६२ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०२४ व मार्च २०२५ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन (Online) अर्ज खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कालावधी | प्रत्यक्ष उपस्थित (In Presence) विहीत शुल्क | पोस्टाव्दारे (By Post) विहीत शुल्क |
|---|---|---|---|
| १) | दि. ०१ जुलै २०२५ ते दि. ३१ जुलै २०२५ पर्यत | रु. ५००/- | रु.६००/- |
| २) | दि. ०१ ऑगस्ट २०२५ ते दि. १५ ऑगस्ट २०२५ पर्यत | रु. ७००/- | रु. ८००/- |
| ३) | दि. १६ ऑगस्ट २०२५ ते दि. ३१ ऑगस्ट २०२५ पर्यत | रु. १७००/- | रु. १८००/- |
| • पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे दीक्षांत अर्ज मुदतीनंतर दि. १० सप्टेंबर २०२५ पर्यत रु. १८००/-शुल्काने स्वीकारले जातील. | | | |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळावरील सर्व सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.
- विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतले नसलेची खात्री करावी व त्यानंतरच अर्ज भरावा. अन्यथा अशा विद्यार्थ्याचे शुल्क परत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना अर्जावरील माहिती बरोबर आहे की नाही याची खातरजमा करावी. जर विद्यार्थ्याच्या इंग्रजीमधील नावात किंवा अन्य काही दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधीत स्वायत्त महाविद्यालय व संबंधीत परीक्षा विभाग यांचेशी संपर्क साधावा व आवश्यक ती दुरुस्ती करुन माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा. तसेच विद्यार्थ्याने मराठी मधील आपले पुर्ण नाव व आईचे नाव बिनचूक नमुद करावे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, सन २०२१-२०२२ पासून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना ABC ID काढून विद्यापीठ संगणक प्रणालीमध्ये त्याची नोंद करणे आवश्यक आहे. सबब ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ABC ID ची नोंद केलेली नाही, त्यांनी प्रथम ABC ID create करुन दुसऱ्या दिवशी त्याची संगणक प्रणालीमध्ये नोंद करुन दुसऱ्या दिवशी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरावा.
- एका पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी एकच ई मेल आयडी वापरावा.
- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- २००२ पासून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी रेग्युलर ऑप्शन (Option) मधून फॉर्म भरण्यात यावा. तसेच २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्याचा फॉर्म Regular ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थीनी फॉर्म भरण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रांसहीत प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क साधावा. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वत:चा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वत:चे आयडेंटीटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी Internship completion Certificate of University प्रत आणणे आवश्यक आहे.) तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/२६०९३०२ व ईमेल convocation@unishivaji.ac.in)
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्याचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.
- दीक्षांत समारंभाची तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ठेवण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना SMS व्दारे कळविण्यात येईल.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेनंतर व शुल्काची कार्यवाही केलेनंतर संगणक प्रणालीमधून पावती तयार होण्याची ६० मिनिटे वाट पाहणे आवश्यक आहे. जर पावती वेळेत तयार झाली नसेल तर पुनश्च शुल्काबाबतची कार्यवाही न करता दीक्षांत विभागाशी तात्काळ संपर्क साधावा.
- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत विद्यापीठाचे ( Internship Completion Certificate of University ) प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce, Dessertation नंतर जाहीर करण्यात येतात, त्या परीक्षांचे अंतिम गुणतक्ता अपलोड करणे आवश्यक आहे..(उदा.M.E./M.Tech/M.Text/M.Arch./M.Pharmacy/M.Phil/Ph.D etc.)
- M.Phil/Ph.D उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये Viva-Voce Date बिनचूक नमूद करावी, निकाल जाहीर झालेल्या पत्राची तारीख नमुद करु नये. ऑनलाईन अर्जासोबत Ph.D Declaration letter अपलोड करावे.
- श्रेणीसुधारणा परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधारणा झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह दीक्षांत विभागास समक्ष संपर्क साधावा. फक्त गुणांमध्ये बदल झाला असेल व श्रेणी सुधारणा झाली नसेल तर त्या विद्यार्थ्यांनी अर्ज करु नये. अशा विद्यार्थ्यांनी पुर्वीचे पदवी प्रमाणपत्र घेतले नसेल तर त्यांनी पुर्वीच्याच गुणतक्त्यानुसार पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता, पिनकोडसहीत बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार/पदवी प्रमाणपत्र पोहचू शकले नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्याची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- पदवी प्रमाणपत्राबाबत तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्याने त्याच्या Login मधील Grievance मध्ये ती नोंदवावी.
- अपु-या अर्जाची दखल घेतली जाणार नाही आणि त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर विहित सर्व प्रक्रीया पुर्ण केलेनंतरही पदवीप्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास, त्या विद्यार्थ्यांनी, दीक्षांत विभागास समारंभानंतर तीन महिन्यापर्यंतच संपर्क साधावा. त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करताना काळजीपूर्वक In Person/In Absentia पैकी योग्य तो ऑप्शन (Option) निवडावा. त्यामध्ये नंतर कोणताही बदल केला जाणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना काही अडचणी उदभवल्यास खालील दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा

  १) ऑनलाईन अर्जाबाबतीत तांत्रिक अडचणीबाबत संपर्क क्रमांक - १) आय.टी.सेल ०२३१-२६०९३३५
  २) संगणक विभाग ०२३१-२६०९३७८

  २) ऑनलाईन शुल्काबाबत उद्भवणाऱ्या अडचणीबाबत संपर्क क्रमांक -लेखा विभाग ०२३१-२६०९०७८

  ३) दीक्षांत विभाग - ०२३१-२६०९११३ /०२३१-२६०९३०२.

**दीक्षांत विभाग**
**दि. २९/०६/२०२५**

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**